॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि.११ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भौतिकशास्त्र प्रशाळेअंतर्गत विद्यापीठाच्या अधिसभा गृहात दि. १० फेब्रुवारी रोजी विद्यापीठ प्रशाळा व संलग्न महाविद्यालयांतील भौतिकशास्त्र विषयात पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी भौतिकशास्त्र विषयात विद्यार्थ्यांची गोडी वाढवून भविष्यातील करिअरच्या संधीची माहिती देण्यासाठी या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी केले. त्यावेळी व्य.प. सदस्य व प्रशाळेचे संचालक प्रा. जयदिप साळी, भौतिकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख तथा कार्यशाळेचे समन्वयक प्रा. संजय घोष, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख डॉ. डी. जे. शिराळे उपस्थित होते.

या कार्यशाळेच्या प्रथम सत्रात **टाटा मूलभूत संशोधन संस्था, हैदराबाद** येथील डॉ. दर्शन जोशी आणि भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था, पुणे येथील प्रा. अप्रतिम चटर्जी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात प्रा. संजय घोष यांनी भौतिकशास्त्र विषयात उपलब्ध असणाऱ्या भविष्यातील संधी या विषयात मार्गदर्शन केले. तसेच यॉर्क विद्यापीठ, युनायटेड किंगडम येथील डॉ. समाधान पाटील व तोकुशिमा विद्यापीठ, जपान येथील डॉ. पंकज कोईनकर यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेसाठी जवळपास २०० विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात फिजिक्स सोसायटीचे अनावरण करण्यात आले असून फिजिक्स सोसायटी सदस्यांचा परिचय करून देण्यात आला. या कार्यशाळेच्या आयोजनासाठी एम. एस. नेतकर, मिलन सोनवणे, राहुल ढोले,प्रसाद जोशी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लेखमाला इंगळे तर आभार प्रदर्शन रोहन बोरसे यांनी केले.

**बातमी क्रमांक २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. ११ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क विभाग व रासायनिक तंत्रज्ञान संस्थेच्या संयुक्त विद्यमाने 'दोन दिवसीय बौद्धिक संपदा हक्क प्रशिक्षण कार्यशाळा' संपन्न झाली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी होते.

यावेळी मंचावर प्रा.डी.जी. हुंडीवाले, प्रा.विकास गीते, प्रा. अजय गोस्वामी, डॉ. योगीता पवार, पंकज पडोळे उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. विजय माहेश्वरी यांनी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांचे बौद्धिक संपदा हक्क नोंदविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. "विद्यार्थ्यांकडे अनेक नाविन्यपूर्ण संकल्पना आणि संशोधनाधारित प्रकल्प असतात. त्यांचे संरक्षण व व्यापारीकरण करण्यासाठी पेटंट आणि औद्योगिक प्रारूप नोंदणी महत्त्वाची आहे. अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळते," असे त्यांनी नमूद केले.

प्रा. अजय गोस्वामी यांनी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांमधून अधिकाधिक स्वामित्व हक्क (पेटंट) आणि औद्योगिक प्रारूपांची निर्मिती व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. संशोधनाधारित विचारसरणी विकसित करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची जाणीव असणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. समारोपप्रसंगी प्रा. दिलीप हुंडीवाले यांनी 'आत्मनिर्भर भारत' संकल्पना साकार करण्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांतिकारी भूमिका बजावणार असल्याचे अधोरेखित केले. संशोधन, नवकल्पना आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला जागतिक स्तरावर सक्षम बनवण्यासाठी एआयचा प्रभावी वापर होणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यशाळेत पुणे येथील 'लॉक युअर आयडिया' कंपनीच्या संचालिका डॉ. योगिता पवार आणि श्री. पंकज पडोळे यांनी विद्यार्थ्यांना व संशोधकांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने पेटंट व औद्योगिक प्रारूपांसाठी पूर्वमाहिती कशी शोधावी, मसुदा कसा तयार करावा आणि अर्ज प्रक्रिया कशी पार पाडावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे समन्वयक प्रा. विक्रम गीते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर कार्यशाळेचे सचिव डॉ. सारंग बारी, महासचिव श्री. मयूर पाटील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. दोन दिवस चाललेल्या या कार्यशाळेत विविध विभागांतील विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सदर कार्यशाळेस केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयामार्फत 'स्प्रिहा' योजनेंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. या उपक्रमामुळे विद्यापीठातील संशोधन व नवोपक्रमाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ११ फेब्रुवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता